कोंडी

मुस्लिम शिक्षण आणि आरक्षणाची...

इतिहासातली मढी उकरून काढत सतत लक्ष्य करत राहायचं. की मग लक्ष्य होत आलेला समाज असुरक्षिततेपायी धर्माच्या आधाराला जातो. कळप करून राहू लागतो. तो तसा राहू लागला की, मुख्य प्रवाहापासून तुटतो. त्याचे जगणे-मरणे बिनमहत्त्वाचे ठरत जाते. सत्तेच्या दरबारात त्याची बाजू मांडणारा कोणी उरत नाही. अशीच काहीशी निराधार अवस्था सर्वसामान्य मुस्लिम अनुभवतो आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी मुस्लिम समाजाला शिक्षण आणि आरक्षणाचा आधार खूप महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन करणारा हा अभ्यासपूर्ण लेख...

• हुमायून मुरसल
humayunmursal@gmail.com

या घटकेला एससी आणि एसटी आरक्षण घटनात्मक आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात आले आहे. याउलट, ओबीसी आरक्षण केवळ कायद्याच्या आधारे आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात नाही. ओबीसी आरक्षण हा हक्क नाही. एससी आणि एसटी वर्गांसाठी सर्वंकष राजकीय आरक्षण वरदान ठरले. राजकीय दबावगट तयार होण्यास याची मदत झाली. नोकरी आणि शिक्षणासाठी स्वतंत्र मेरिट, बढती, सवलती, अंदाजपत्रकी स्वतंत्र तरतुदींसह विकासात निश्चित वाटा मिळाला. ओबीसी जाती या संख्येमुळे राजकीयदृष्ट्या प्रभावशाली आहेत. खासकरून मंडल आयोगाच्या शिफारशींनंतर या जातींनी सत्तेमध्ये आपले बस्तान बसविले. मंडल आयोगाने मुस्लिमांचा ओबीसींमध्ये समावेश केला. तरी मुस्लिमांना सत्तेमध्ये स्थान मिळवण्यात किंवा विकासामध्ये वाटा मिळवण्यात ओबीसी म्हणून फारसा उपयोग झाला नाही.

महाराष्ट्रात, सध्या १९ टक्के ओबीसी आरक्षणामध्ये ठराविक मुस्लिम जातीच आरक्षणास पात्र आहेत. पिंजारी, दर्जी, नालबंद इत्यादी जाती ओबीसी यादीत असल्या तरी बहुतेकांकडे व्यावसायिक, महसुली अथवा शैक्षणिक कागदोपत्री पुरावेच नाहीत. त्यामुळे पात्र असूनही यांना ओबीसी दाखले मिळत नाहीत. गेल्या ५०० वर्षांत मुस्लिमांनी अरबी, फारसी आडनावे स्वीकारली. त्यातले पठाण, सय्यद, बेग, मिर्झा इ. आडनाव असणारे ओबीसी असूनही मागास मानले जात नाहीत. देसाई, कुलकर्णी किंवा गावच्या नावावरून आडनावे असणारे जसे - इंचनाळकर, सोलापुरे.. अशा लोकांचा ओबीसी यादीत समावेश आढळत नाही. अशा लोकांना दाखले मिळवण्याचे मार्ग आहेत. पण, जाच अधिक आणि खात्री कमी आहे. सच्चर समितीने दिलेल्या आकडेवारीप्रमाणे महाराष्ट्रात केवळ ११ टक्के मुसलमान ओबीसी पात्र आहेत. १९ टक्के ओबीसी आरक्षणात वरचढ आणि सत्ताधारी जातींशी स्पर्धा असल्यामुळे नोकरीत आरक्षणाचा उपयोग होत नाही. सरकारी नोकरीतील ३.५ टक्के प्रमाण पुढे सरकत नाही. याची दखल घेत न्यायमूर्ती सच्चर आणि न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा या दोन्ही आयोगांनी मुस्लिमांना ओबीसीचे फायदे पोहोचले नाहीत, असे स्पष्ट करून इतर अनेक उपाययोजना सुचवल्या आहेत. पण तिकडे कोणी लक्ष देत नाही.

या पार्श्वभूमीवर, आजचे १९ टक्क्यांतील ओबीसी आरक्षण चालू ठेवून उर्वरित ९० टक्के वंचित मुस्लिम समाजासाठी ५ टक्के स्वतंत्र कोटा कर्नाटक धर्तीवर देण्यात यावा, अशी मागणी 'हिंदी हैं हम' या चळवळीच्या वतीने आम्ही केली होती. कर्नाटक सरकारने हावनुर कमिशन (१९७०) नेमले होते. या कमिशनच्या शिफारसींच्या आधारे अतिमागास प्रवर्गातील जातीसोबत १५ टक्के कोट्यात समकक्ष मुस्लिम जातींचा समावेश आहे. शिवाय मुस्लिमांकडे जात नोंदीचा पुरावा नसल्याची अडचण लक्षात घेऊन, २ लाख रुपये उत्पन्न असलेल्या सर्व मुस्लिमांना ४ टक्के स्वतंत्र कोटा मंजूर केलेला आहे. येथे मुस्लिम असणे पुरेसे आहे. जात दाखल्याची गरज नाही. या आरक्षणाला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले होते. पण सुप्रीम कोर्टाने सदर आरक्षणाला मंजूर करून शिक्कामोर्तब केले. जात पुरावा नसल्याने ओबीसी सवलतीपासून वंचित ठेवणारे प्रकरण या मार्गाने निकाली निघते. न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा कमिशननेसुद्धा अहवालात ही नोंद केली आहे.

अनमानधपक्या पद्धतीने नकार

खरे तर २००४ सालापासून आम्ही मुस्लिम समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणाचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी मुस्लिम आयोग स्थापन करण्याची मागणी महाराष्ट्र सरकारकडे केली होती. सातत्याने संघर्ष केल्यानंतर २००९ मध्ये मागणी मान्य झाली आणि डॉ. मेहमदूर रेहमान अभ्यास गट स्थापन करण्यात आला. या अभ्यासगटाशी आमची सविस्तर चर्चा झाली. मेहमदूर अभ्यासगटाने मागणीच्या पुढे जाऊन ८ टक्के आरक्षण कोटा देण्याची शिफारस केली. सरकारने २०१४ मध्ये मेहमदूर अभ्यासगटाचा आधार घेऊन ५ टक्के आरक्षण देताना केवळ ५० जातींचा अनमानधपक्या पद्धतीने यात समावेश केला. आमच्या कर्नाटकधर्तीवर आरक्षण मागणीला आघाडी सरकारने हरताळ फासला. पुढे, मराठा समाजाला १६ टक्के आणि मुस्लिमांना ५ टक्के दिलेले आरक्षण प्रकरण हायकोर्टात गेले. कोर्टाने मुस्लिमांचे शैक्षणिक आरक्षण चालू ठेवण्यास सांगितले आणि नोकरीतील आरक्षणाला तात्पुरती स्थगिती दिली. कोर्टाची मंजुरी असूनदेखील मुस्लिमांना धर्माच्या आधारे आरक्षण देता येणार नाही, अशी भूमिका भाजप

सरकारने घेतली. उलट, मराठा आरक्षण नामंजूर झाले तरी विधानसभेत नव्याने कायदा केला. आता सुप्रीम कोर्टात मराठा आरक्षण मंजूर होण्यासाठी महाराष्ट्र सरकार धडपडत आहे. मुस्लिम आरक्षण देणारा अध्यादेश कालगत झाला आहे. त्यामुळे मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र सरकारला नव्याने निर्णय आदेश काढणे किंवा कायदा करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सरकार असा निर्णय घेईल का, हाच मोठा प्रश्न आहे.

हक्काबाबत मुस्लिम अनभिज्ञ की उदासीन

यूपीए काळात केंद्रात मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण जाहीर केले. पण प्रकरण कोर्टात लटकले. मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण कोटा न मिळाल्याने निर्माण होणाऱ्या बॅकलॉगचा हिशेब केला, तर केंद्रीय नोकरीत ९.३ लाख आणि महाराष्ट्रात ४६ हजार हक्काच्या जागा मिळायला हव्यात. या जागा मिळत नसल्याने आज मुस्लिम समाज आपल्या मिळकतीतले दरवर्षी ३४ हजार कोटी रूपये गमावतो आहे! तरीही मुस्लिमांना याचा राग नाही, की मनात असंतोष खदखदताना दिसत नाही. हा



समाज आरक्षण मिळवण्यासाठी जोरदार संघर्ष उभारतो, असेही दिसत नाही. मुस्लिम समाजात इतकी उदासीनता का? मुस्लिम समाजाने आत्मविश्वास गमावला आहे. त्यांचा सरकारवर विश्वास राहिलेला नाही. मुस्लिम जनता आणि त्यांचे नेते यांचा परस्परांवर विश्वास नाही. राजकीयदृष्टया संदर्भहीन झालेल्या मुस्लिम समाजाला आरक्षण कोटा मिळण्याची शक्यता धूसर दिसते.

दलितांहूनही भीषण स्थिती

यूपीएच्या काळात न्या.सच्चर आणि न्या. रंगनाथ मिश्रा असे दोन केंद्रीय आयोग स्थापन करून मुस्लिमांच्या मागासलेपणचा अभ्यास करण्यात आला. या दोन्ही आयोगांनी मुस्लिमांची स्थिती दलितांहून विदारक असल्याचे सप्रमाण अहवाल सादर केले. या दोन्ही आयोगांनी मुस्लिमांना ओबीसी फायदे मिळत नसल्याचे अधोरेखित केले. सच्चर कमिटीने आरक्षणाची शिफारस केलेली नाही. मात्र देशात 'समान संधी आयोग' स्थापन करण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारस केली. हा विषय महत्त्वाचा असला तरी यावर स्वतंत्र लेख आवश्यक आहे. रंगनाथ मिश्रा कमिशनने धार्मिक अल्पसंख्याकांच्या आणि खासकरून मुस्लिमांच्या आरक्षणासंदर्भात केलेल्या खालील शिफारशी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

१. संपूर्ण मुस्लिम धार्मिक समूह मागासवर्ग मानला जावा. १६(४) आणि कलम ४६ अंतर्गत 'मागास' संबोधताना 'सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या' मागास असे मर्यादित करू नये. अल्पसंख्याकांना १५ टक्के जागा राखीव ठेवाव्यात. यापैकी १० टक्के जागा मुस्लिमांना व इतर अल्पसंख्याकांना ५ टक्के देण्यात याव्यात. (रंगनाथ मिश्रा अहवाल : प्रकरण २:९, प्रकरण १०:१६. २.१, १६.२.२, १६.२.१६)

२. प्रेसिडेंशियल ऑर्डर १९५० मधील उपकलम ३, एससी आरक्षण केवळ हिंदू, शीख व बौद्ध धर्मातील व्यक्तींपुरते मर्यादित करते. आरक्षणात धर्मभेद करणारे कलम रद्द करून आणि एसटीप्रमाणे रिलिजन न्यूट्रल ठेवण्याची शिफारस या आयोगाने केली आहे. म्हणजे इतर धर्मातील समकक्ष अतिशूद्र जातींना एससी आरक्षणाचा लाभ मिळेल. (प्रकरण १०:१६.३.७)

३.न्यायालयीन निर्णयावर, राष्ट्रीय एकात्मतेची गरज म्हणून अल्पसंख्याक संस्थामध्ये ५० टक्के जागा बहुसंख्याकांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. याच न्यायाने आणि उद्देशाने सर्व बहुसंख्याक शैक्षणिक संस्थांमधून अल्पसंख्याकांसाठी १५ टक्के राखीव जागा असाव्यात. यामध्ये १० टक्के मुस्लिमांसाठी असाव्यात. (प्रकरण ७:७:१.४)

आयोगाच्या शिफारशींचा पाठपुरावा महत्त्वाचा

या शिफारशींचा वापर ही आपल्या हक्कांचा पाया विस्तारित करण्यासाठी मुस्लिमांना चांगली संधी होती. अल्पसंख्याक संस्थांमध्ये सामाजिक विविधता असावी म्हणून मुस्लिमेतर समाजाला ५० टक्के आरक्षण देण्याचे बंधन सुप्रीम कोर्टाने घातले आहे. मग याच न्यायाने इतर सर्व मुस्लिमेतर संस्थांमध्ये मुस्लिमांना निदान १० टक्के आरक्षण का नाही? रंगनाथ मिश्रा आयोगाने स्वतः हा मुद्दा उपस्थित करून वरीलप्रमाणे १० टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली. तरीही ही मागणी मुस्लिमांना पुढे रेटता आली नाही. मुळात आयोगांचे अहवाल वाचतो कोण? राजकीय जागृती आणि संघटित शक्तीचा अभाव, हे यामधील अपयशाचे प्रमुख कारण आहे. मुस्लिम आरक्षणाला घटनात्मक कोणतीही अडचण नाही. भारतात आरक्षणाची आज मुस्लिमांना सर्वाधिक

गरज आहे. म्हणूनच रंगनाथ मिश्रा कमिशनने केलेल्या शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तामिळनाडू सरकारने राज्यात ६९ टक्के आरक्षण देणाऱ्या १९९३ च्या कायद्याला केंद्र सरकारने ७६ वी घटनादुरूस्ती करून या कायद्याला घटनेच्या ९ व्या परिशिष्टात समाविष्ट करून कोर्टाच्या हस्तक्षेपापासून संरक्षित केले. मुस्लिमांना आरक्षण देण्यात अडथळे कायमचे दूर करण्यासाठी याच प्रकारचे संरक्षण मुस्लिम आरक्षणाला देण्याची गरज आहे. पण अपेक्षा व्यक्त करून किंवा इतर राजकीय पक्षांच्या भरवशावर मुस्लिमांना आरक्षण मिळणे कठिण आहे.

महाराष्ट्रात मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण कोटा मिळेल ?

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाचे प्रमाण ५० टक्क्यांवर मर्यादित केले आहे. पण अनेक नव्या ओबीसी समूहांनी स्वतंत्र कोट्याची मागणी रेटली. मतांच्या राजकारणापायी बऱ्याच राज्य सरकारांनी याला मान्यता दिली. केंद्र सरकारने आर्थिक आधारावर जातीय मागासलेपणाचा आधार बदलून १० टक्के आरक्षण मंजूर केले. आरक्षण ५० टक्क्यांच्या पुढे गेल्याने प्रकरण पुन्हा सर्वोच्च न्यायालयात गेले. आता, सर्वोच्च न्यायालय ५० टक्के आरक्षण बंधनाचा पुनर्विचार करण्यास राजी झाले आहे. बहुधा विशिष्ट परिस्थितीत आरक्षणाचे प्रमाण वाढविण्यास परवानगी मिळण्याची शक्यता दिसते. महाराष्ट्रापुरता विचार केला, तर आजचे आरक्षण ५२ टक्के आहे. राज्याने कायदा करून मराठा समाजाला अधिकचा १६ टक्के विशेष कोटा मंजूर केला आहे. त्यामुळे या क्षणी महाराष्ट्रात आरक्षण ६८ टक्के झाले आहे. मुस्लिमांना प्रथम आरक्षण कोटा मंजूर झाला असता तर आरक्षणाचे प्रमाण ५७ टक्के झाले असते. त्यानंतर पुन्हा मराठा समाजाला १६ आरक्षण देणे शक्य झाले नसते. ही अडचण लक्षात घेऊन, मुस्लिम आरक्षण डावलण्यात आले. मराठा समाजाला अग्रक्रमाने प्रथम आरक्षण मंजूर करण्यात आले. तळे राखील तो पाणी चाखील हे स्वाभाविक आहे. शिवाय मुस्लिम विरुद्ध मराठा वाद मुस्लिमांना परवडणारा नाही. थोडक्यात, सुप्रीम कोर्टाने आरक्षण कोटा वाढवून दिला तरी त्याचा लाभ मुस्लिमांना मिळेल, याची शाश्वती नाही.

मुळात, शैक्षणिक संस्थेत दाखल होऊन यशस्वी बाहेर पडण्याचे सर्वसाधारण प्रमाण १५ टक्के आहे. मुस्लिम समाजात यशाचे प्रमाण ५ टक्केसुद्धा नाही. यासाठीच मुस्लिमांना निदान शिक्षणात आरक्षण गरजेचे आहे. खाजगीकरण आणि खुली बाजार पद्धती स्वीकारल्यानंतर मुस्लिमांना नोकरीत आरक्षण मिळण्याची शक्यता नाही. समान संधी आयोगाचा युरोप,

> **गेल्या ७०० वर्षांत मुस्लिमांनी अरबी, फारसी आडनावे स्वीकारली. त्यातले पठाण, सय्यद, बेग, मिर्झा इ. आडनाव असणारे ओबीसी असूनही मागास मानले जात नाहीत. देसाई, कुलकर्णी किंवा गावच्या नावावरून आडनावे असणारे जसे - इंचनाळकर, सोलापुरे.. अशा लोकांचा ओबीसी यादीत समावेश आढळत नाही.**

अमेरिका आणि द. आफ्रिकेत अनुभव चांगला आहे. पण ही मागणी मान्य होण्याची आणि मुस्लिमांना न्याय मिळण्याची शक्यता सध्या दिसत नाही. महाराष्ट्रात मुस्लिमांचे दारिद्र्य ५० टक्क्यांहून अधिक झाले तरी त्यांच्यासाठी विकासाचे कार्यक्रम स्वीकारले जाण्याची शक्यता नाही. मुळात आरक्षण किंवा विकास कार्यक्रमाचे निर्णय सत्ताधारी वर्गाची इच्छाशक्ती, त्यांचे राजकीय हितसंबंध आणि आरक्षण किंवा विकासाची मागणी करणाऱ्या समाजाचे परिणामकारक सत्तासंबंध यांच्या संतुलनातून होतो. भारतात किंवा महाराष्ट्रात मुस्लिम समाज वंचित आणि मागास आहे. राजकीयदृष्ट्या प्रभावहीन आहे. त्यामुळे मुस्लिम आपले हक्क मिळवण्यास असमर्थ आहेत, हे आजचे कटू वास्तव आहे.

अशा परिस्थितीत, मुस्लिमांच्या शैक्षणिक विकासासाठी घटनेतील कलम २५, २९ आणि ३० मधील तरतुदींना अनुसरून, केंद्र आणि राज्य सरकारांनी ५० टक्के आरक्षणाची तरतूद असणाऱ्या सर्व स्तरांवरील अल्पसंख्य विशेष शैक्षणिक संस्था उभारायला हव्या. किंवा, मुस्लिम समाजाला संशोधन आणि शैक्षणिक संस्था उभारण्यासाठी जमीन, इतर सुविधा आणि विशेष अनुदान द्यायला हवे. मात्र कोणत्याही सत्ताधारी पक्षांची तशी राजकीय इच्छाशक्ती दिसत नाही. राज्यसत्तेच्या मजबुरीतून काही घडले तर ...अन्यथा मुस्लिमांना स्वावलंबी होण्याशिवाय पर्याय दिसत नाही !

मुस्लिमांसाठी स्वावलंबी मार्ग

शिक्षणाची परवड आणि आरक्षणाभोवतीच्या राजकीय अपरिहार्यता पाहता, मुस्लिम समाजाने आता 'नॉलेज सोसायटी' घडविण्याचा ध्यास घेतला पाहिजे. सर्वोत्तम मानव संसाधन घडविण्यासाठी अधिक कष्ट उपसले पाहिजेत. त्यासाठी गुंतवणूक आणि संशोधन, विकास आणि शैक्षणिक संस्थांची उभारणी करावी लागेल. या कार्यात बुद्धिजीवी वर्गाचे

योगदान महत्त्वाचे ठरेल. यासंदर्भात 'कोंडी आरक्षणाची आणि मुस्लिमांची', 'रेनेसॉ फॉर नॉलेज सोसायटी' आणि इतर पुस्तके उपलब्ध आहेत. जिज्ञासूंनी ती वाचावीत. शब्दमर्यादेपोटी या ठिकाणी त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे तेवढे मांडत आहे.

मुस्लिमांना बुद्धिजीवी, विवेकवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन देऊन आधुनिक 'नॉलेज सोसायटी'मध्ये परिवर्तन घडविणारी सामाजिक चळवळ आवश्यक आहे. ज्याद्वारे विकसित होणारे मानव संसाधन ज्ञानाधारित औद्यागिक व्यवस्थेमध्ये पाय रोवेल, अशी अपेक्षा आहे. रेनेसॉकरिता काही विचारसूत्र आणि कार्यक्रम आम्ही आखला आहे. या विचारसूत्राद्वारे अपेक्षित समाज परिवर्तनालाच आम्ही 'रेनेसॉ' म्हणतो.

१. वर्क ऑफ गॉड आणि वर्ड ऑफ गॉड यांच्यामध्ये सुसंगती आहे. म्हणून विज्ञान आणि कुरआनिक सूत्र यांच्यामध्ये अंर्तविरोध नाही. वैज्ञानिक समाज आणि इस्लामिक समाजात द्वंद्व नाही.

२. शुद्ध आध्यात्मिक जीवन व्यतीत करण्यास राज्यघटना मान्यता देते. त्यामुळे शरिया आणि राज्यघटना यांच्यामध्ये अंतर्विरोध नाही.

३. धर्मनिरपेक्षता, विविधता आणि लोकशाही विचार ही मुस्लिमांची जीवनदृष्टी बनावी.

४. सामाजिक समता आणि स्त्री-पुरुष समानता हे जीवनमूल्य बनावे.

५. आधुनिक विचारसरणी, अभिव्यक्ती आणि विचार स्वातंत्र्याचा मुक्तपणे स्वीकार व्हावा.

६. अल्पसंख्याक समजून वेगळेपण जपण्याऐवजी मुस्लिमांनी बहुजनांसोबत बहुमताचा भाग बनावे.

७. भारतीय समाज आणि देशाच्या हितात मुस्लिमांचे हित सामावले आहे. त्यामुळे व्यापक ध्येयधोरण, संशोधन, शिक्षण आणि विकास कार्यात योगदान द्यावे.

केवळ उपदेशाने आणि प्रबोधनाने 'ज्ञानाधारित समाज' प्रत्यक्षात येणार नाही. हे काम संस्थात्मक आणि व्यावसायिक पद्धतीने करावे लागेल. यासाठी दोन संस्था उभाराव्या लागतील.

१) सेंटर फॉर रेनसॉ : या केंद्राला आम्ही सोशल लॅबोरेटरी मानतो. येथे समाज परिवर्तनाचे आणि सोशल इंजिनिअरिंगचे काम चालेल. मानव संसाधन विकास याचे मुख्य कार्य आहे. येथे मूलतः सामाजिक, शैक्षणिक आणि विकासाच्या क्षेत्रात अभ्यास, संशोधन होईल. याआधारे समस्यांची सोडवणूक करण्यात येईल. भारत आणि जगभरातील विद्वान, संशोधक, शास्त्रज्ञ आणि कार्यकर्ते येथे बौद्धिक चर्चेसाठी येतील. कार्यकर्त्यांचे निरंतर प्रशिक्षण होईल.

२) मुस्लिम युनिव्हर्सिटी : अत्युच्च शिक्षण, संशोधन आणि विकासासाठी मुस्लिमांना अत्याधुनिक मुस्लिम युनिव्हर्सिटी स्थापन करावी लागेल. शिक्षण, विकास आणि संशोधनासाठी सेंटर फॉर रेनेसॉला युनिव्हर्सिटी पाठबळ देईल. मुस्लिम युनिव्हर्सिटीसारख्या अत्युच्च संशोधन आणि शिक्षण संस्थेविना जागतिकीकरण, आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मुस्लिमांना आपली प्रगती साध्य करता येणार नाही. औद्योगिक समाजात स्थान मिळवता येणार नाही. कला, संस्कृती, विज्ञान, तंत्रज्ञान तसेच मानवी शास्त्रांत प्रगती साध्य होणार नाही.

नेतृत्वहीनतेचा काळ : दुर्दैवाने, मुस्लिम समाजामध्ये आत्मविश्वास जागा करू शकेल असे नेतृत्व आजच्या घडीला नाही. व्यापक सामाजिक चळवळ नाही. विचारवंत वर्ग नगण्य आणि समाजापासून दूर आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत समाज पराभूत मानसिकतेत जगतो आहे. समाजातील ही पोकळी पुराणमतवादी धार्मिक नेत्यांनी भरून काढली आहे. त्यांनी समाजाला दैववादी बनवून कर्मकांडात मग्न करून टाकले आहे. समाज आधुनिकता आणि नवविचारांपासून कोसो दूर आहे. तीव्र गतीने होणारे आर्थिक आणि जागतिक राजकीय बदल, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास, वाढते उद्योग या सर्व बाबतीत तो संदर्भहीन बनत चालला आहे. राजकीय सत्तेपासून तर तो पूर्णपणे बेदखल झाला आहे. या स्थितीत मुस्लिमांना आपली राजकीय कमजोरी संपवावी लागेल. याकामी अशा संस्था आणि चळवळ यांचा एकत्रित प्रयोग आशेचा किरण आहे. प. महाराष्ट्रासाठी असा एक प्रयोग सध्या कोल्हापूर येथे सुरू आहे. या प्रयोगात सहभागी होण्याचे ईदच्या निमित्ताने मी वाचकांना आवाहन करतो !

(लेखक सेंटर फॉर रेनेसॉचे अध्यक्ष आहेत.)

• संपर्क: ९९७५४ ३७५४९